महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक येथे महाव्यवस्थापक (विपणन) पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन आदेश क्रमांकः संकीर्ण-३७१७/प्र.क्र.२०४/का. १५**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक**
**मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२**
**तारीख: १६ डिसेंबर, २०१७**

**वाचा :-**

१) महसूल व वन विभागाचे पत्र क्र.डीपीटी-०९१७/प्र.क्र.९९/ई-२, दि.०६/१०/२०१७
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक यांचे पत्र क्र.आविम /प्रशा / आस्था-२/२०८९/२०१७, दि.३०/०८/२०१७
३) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का.१२, दि.१७.१२.२०१६

**शासन आदेश :-**

श्री.विनय यशवंत गोसावी, उप जिल्हाधिकारी, गट-अ यांची महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक येथे महाव्यवस्थापक (विपणन) या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे. यानुसार श्री. विनय गोसावी यांनी सदर पदावर त्वरीत रूजू व्हावे.

२. श्री.विनय गोसावी यांची सदर नियुक्ती ही महाव्यवस्थापक (विपणन) या पदाचा पदभार स्विकारल्यापासून एक वर्ष किंवा शासनाचे पुढील आदेश यापैकी जे अगोदर होईल त्या कालावधीसाठी राहील.

३. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक मधील महाव्यवस्थापक (विपणन) या पदाची वेतनसंरचना रू.१५६००-३९१००,ग्रेड वेतन ६६०० अशी आहे. तथापि, श्री.गोसावी हे रू.१५६००-३९१००,ग्रेड वेतन ५४०० या वेतनसंरचनेमधील अधिकारी असल्यामुळे महाव्यवस्थापक (विपणन) या पदाची वेतनसंरचना श्री. गोसावी हे सदर पदावर कार्यरत असेपर्यंत रू.१५६००-३९१००,ग्रेड वेतन ५४००/- या वेतनसंरचनेत तात्पुरत्या स्वरूपात अवनत करण्यात येत आहे.

४. सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत. श्री.गोसावी यांना सदर शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

५. श्री .विनय गोसावी यांना सदर पदावर रुजू होण्यासाठी महसूल व वन विभागाने तात्काळ कार्यमुक्त करावे.

६.	सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१६१२१८५६६३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Govind Mahadeo Mainkar
Date: 2017.12.16 12:05:31 +05'30'

**( गोविंद माईणकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (आदिवासी विकास ) , मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) , मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव , महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य -१, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य -२, नागपूर
८. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य -१, मुंबई
९. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य -२, नागपूर
१०.सर्व उप सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११.उप सचिव ( आस्थापना), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
१३.श्री. विनय यशवंत गोसावी, उप जिल्हाधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.कक्ष अधिकारी (कार्या. ३), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवड नस्ती (का.१५)